

# शिवभक्तीतून उभारला रायगड 'रोप-वे'

-नीलिमा साने

**रोप-वे सुरू झाल्यामुळे रायगडला भेट देणाऱ्यांची संख्या मात्र वेगाने वाढत गेली. रायगड भेट हा फक्त तरुणांचा विषय राहिला नाही. आबाल वृद्धांसह सहकुटुंब रायगडला येणाऱ्यांची संख्या रोप-वेमुळे वाढत गेली. काही वर्षांपूर्वी इंदिरा गांधी रायगडावर आल्या होत्या. तेव्हा त्यांना हेलिकॉप्टरने गडावर उतरावे लागले होते. रोप-वे झाल्यानंतर पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयींसह सगळे पाहुणेही आता रोप-वेनेच गडावर जातात...**

छत्रपती शिवरायांची राजधानी असलेल्या रायगडला भेट देणाऱ्या शिवभक्त आणि पर्यटकांसाठी रोप-वे हे महत्त्वाचे आकर्षण ठरले आहे. रोप-वे बरोबरच तिथे आता निवासाची व्यवस्थाही करण्यात आली आहे. हा रोप-वे उभारणारी आणि चालविणारी मिलेनियम प्रॉपर्टीज प्रा.लि. ही संस्था रूढ अर्थाने पर्यटन संस्था नाही. जोग मंडळी ही मुळात इंजिनिअरिंग व्यवसायातली. रस्ते बांधणी, उड्डाण पूल, मुंबई-पुणे एक्स्प्रेस हायवे यामध्ये त्यांनी मोठे नाव कमावले आहे. आजही राजेंद्र जोग देशात आणि परदेशात जलविद्युत प्रकल्पांसाठी लागणारी बांधकामे करीत आहेत. रोप-वेचा कारभार सांभाळतात त्या त्यांच्या पत्नी वैशाली जोग.

रोप-वे रायगडावर कसा बांधला गेला याची वैशालीताईंनी सांगितले की कहाणी मोठी सुरस आहे. खरे तर ती एका जिद्दीची कहाणी आहे. राजेंद्र जोग त्यावेळी, म्हणजे १९९० च्या सुमारास, नू.म.वि. प्रशालेत शिकत होते. रायगड स्मारक समिती दरवर्षी रायगडावर शिवपुण्यतिथी साजरी करते. त्यासाठी नूमवितली ही मुले दोन दिवस आधीच रायगडावर जायची आणि सगळा परिसर स्वच्छ करायची. जोग कुटुंब मूळचे वाईचे. पण राजेंद्रच्या वडिलांनी, म्हणजे व्ही.एम.जोग यांनी, कधीच रायगड पाहिला नव्हता. मुले दरवर्षी तिथे का जातात या कुतूहलाने तेही रायगडला जाण्याचा हट्ट धरून बसले. त्यांना मधुमेह तर होताच, पण हृदयविकाराचा त्रासही होता. त्यांना रायगड चढून जाता येणार नाही असे राजेंद्रला वाटत होते. पण ते निघालेच.

रायगडाच्या पायथ्याशी पोचल्यावर राजेंद्रने, वडिलांनी म्हणजे दादासाहेबांनी, डोली तरी करावी असा आग्रह धरला. पण त्यांनी तो जुमानला नाही. एखाद्या अस्सल शिवभक्ताप्रमाणेच तेही अर्धा गड चढून गेले. पण तोपर्यंत त्यांना खूप त्रास व्हायला लागला. रक्तातली साखर एकदम कमी झाली. डोळे पांढरे झाले. राजेंद्रने नेहमीच्या सवयीने तात्पुरते उपचार केले. थोडी विश्रांती घ्यायला लावली. मग 'आपण घरी परतूया' असा आग्रह धरला. दादासाहेब मात्र त्याला तयार नव्हते. 'माझा प्राण इथेच गेला, तरी चालेल, पण गड चढून शिवरायांचं दर्शन घेणारच' असा हट्ट त्यांनी धरला. तेव्हा राजेंद्रने कसेबसे डोलीत बसण्यास त्यांना तयार केले. ते तयार होताच अर्धा गड उतरून त्याने डोली आणली आणि दादासाहेबांना गडावर नेले. शिवरायांच्या समाधीसमोरच दादासाहेबांनी शपथ घेतली, ती रोप-वे बांधण्याची.

रायगड स्मारक समितीकडे चौकशी केल्यावर कळले की असा रोप-वे बांधायला बॅ. अंतुले मुख्यमंत्री असतानाच सरकारने परवानगी दिली आहे. त्यावेळी कोलकत्याच्या एका प्रसिद्ध कंपनीकडून खर्चाचा अंदाजही मागवण्यात आला होता.

त्यांनी ८ कोटीचे बजेट समोर ठेवले. साहजिकच तो विषय तसाच रेंगाळला. सरकारनेही परवानगी देण्यापलीकडे कोणतेही ठोस पाऊल उचलले नव्हते. पण दादासाहेबांच्या दृष्टीने परवानगी मिळाली आहे, हीच गोष्ट खूप महत्त्वाची होती. ते स्वत: बांधकाम व्यवसायात असल्याने रोप-वे ला एवढा खर्च येणार नाही याची त्यांनी खात्री होती. म्हणूनच रोप-वे बांधण्याची योजना त्यांनी व्यक्तिश: आपल्या खांद्यावर घेतली.

रोप-वे बांधायचा, तर आधी तो कुठे असावा याची जागा निश्चित करणे आवश्यक होते. त्यासाठी हवाई पाहणी करायला हवी होती. त्याकाळी आजच्यासारखी खाजगी हेलिकॉप्टर्स सहज मिळत नव्हती. म्हणून दादासाहेबांनी डॉ.एस.व्ही.भावे यांच्याशी संपर्क साधला. डॉ. भावे हे आपल्या संशोधनासाठी हेलिकॉप्टरचा उपयोग करून हवाई फोटोग्राफी करत असत. त्यांनी हेलिकॉप्टर तर दिलेच, पण स्वत:ही बरोबर आले. दादासाहेब, राजेंद्र, बाबासाहेब पुरंदरे आणि डॉ.भावे अशा निवडक लोकांनी हवाई पाहणी केली आणि दोन जागा निश्चित केल्या. एक रायगडवाडीकडची आणि दुसरी सध्याची.



रायगडवाडीच्या लोकांना तिथे रोप-वे होणे मान्य नव्हते. त्यामुळे एकच पर्याय शिल्लक राहिला आणि त्या परिसरातल्या लोकांनी या प्रकल्पाचे स्वागत केले. ३०-४० लाख रुपये खर्च करून पायथ्याकडचे बांधकाम पूर्ण होत आले आणि मध्येच एक अडचण आली. वन खात्याने या बांधकामाला हरकत घेतली. पुरातत्त्व खाते आणि वन खाते यांच्यात जागेबद्दलचा वाद होता. पण हा वाद सुटला आणि वन खात्याचीही परवानगी मिळाली. मात्र या सर्व गोंधळात खर्च बारेमाप वाढत गेला. दादासाहेबांची सर्व मुले याच व्यवसायात होती आणि नवे नवे प्रकल्प त्यांच्याकडे येत होते. त्यांच्या प्राथमिकता वेगळ्या होत्या. पण दादासाहेबांच्या आग्रहाखातर रोप-वे साठी सतत पैसे घालावे लागत होते. खर्चाचे नवेनवे विषय पुढे येत होते. ग्रामीण भागात विजेचे भारनियमन १२-१२ तास असल्याने रोप-वे चालवण्यासाठी जनरेटर घेणे भाग होते. असे करत करत खर्च अडीच कोटींवर पोचला. साहजिकच घरात त्यामुळे तणावही निर्माण झाला. पण दादासाहेबांनी जिद्दीने हे काम पूर्ण केलेच.

रोप-वे बांधून पूर्ण झाल्यानंतरही तो कोणाकडे तरी चालवण्यासाठी देऊन मोकळे होणे अवघड होते. त्यामुळे तो चालवण्याची जबाबदारीही जोगांवरच पडली. रोप-वे सुरू झाल्यामुळे रायगडला भेट देणाऱ्यांची संख्या मात्र वेगाने वाढत गेली. रायगड भेट हा फक्त तरुणांचा विषय राहिला नाही. आबाल वृद्धांसह सहकुटुंब रायगडला येणाऱ्यांची संख्या रोप-वेमुळे वाढत गेली. काही वर्षांपूर्वी इंदिरा गांधी रायगडावर आल्या होत्या. तेव्हा त्यांना हेलिकॉप्टरने गडावर उतरावे लागले होते. रोप-वे झाल्यानंतर पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयींसह सगळे पाहुणेही आता रोप-वेनेच गडावर जातात.

रोप-वे सुरू झाला तेव्हा वर जाऊन खाली येण्यासाठी ३० रु. आकारले जात होते. पण देखभालीचा वाढता खर्च, वीज आणि डिझेलचे वाढते दर, यामुळे आता रोप-वे ने जाऊन येण्यासाठी १६० रु. द्यावे







लागतात. पर्यटकांची संख्या सतत वाढत गेली तसे आणखीही काही प्रश्न उभे राहिले. दोन पाळण्यातून प्रत्येकी चार लोक एकावेळी वर किंवा खाली जाऊ शकतात. त्यामुळे गर्दीच्या वेळी वाट पाहण्याचा वेळही वाढत गेला. मग पर्यटकांसाठी जोग यांनी अनेक सोयी उभारायला सुरुवात केली. पायथ्याशीच त्यांनी एक संग्रहालय उभे केले. बाबासाहेब पुरंदरे, निनाद बेडेकर यांच्या मदतीने शिवरायांशी संबंधित वस्तू व कागदपत्रे मिळवून या संग्रहालयात ठेवली. रायगड का आणि कशासाठी पाहायचा यावर २२ मिनिटांची फिल्म तयार केली. तीही या संग्रहालयातच सर्वांना आधी दाखवली जाते. 'गडाचे पावित्र्य राखा' हे तर सांगितले जातेच पण बरोबर कोणी आक्षेपार्ह वस्तू नेत नाही ना, हेही पाहिले जाते.

रोप-वेमुळे गडावर जाणाऱ्यांची संख्या आता २ लाखांवर पोचली आहे. गड चढून येणाऱ्यांची संख्याही तेवढीच असते. अनेक जण कोकण प्रवासाचा मोठा कार्यक्रम ठरवून त्यात रायगडला भेट देतात. येथे पूर्वी निवासाची कोणतीही व्यवस्था नसल्याने अशा प्रवाशांची अडचण होत असे. जोगांनी त्यासाठी तिथे निवासव्यवस्थाही उभारल्या. त्यात वातानुकूलित खोल्यांपासून डॉर्मिटरीपर्यंत सगळ्या व्यवस्था आहेत. खाली आणि वर सुसज्ज उपहारगृहेही उभी राहिली आहेत. त्यामुळे रायगडला जाणे आता सोपेच नव्हे तर सर्व सुखसोयींनीयुक्त झाले आहे.

रोप-वे सारखा एखादा प्रकल्प उभा राहतो, तेव्हा त्याच्या आजूबाजूने रोजगाराच्या संधीही वाढत असतात. रोप-वेच्या प्रकल्पावरच ४० स्थानिक लोकांना राजेगार मिळाला आहे. गडावर येणाऱ्यांना उत्तम प्रकारची माहिती देण्यासाठी त्यांनी प्रशिक्षित गाईड्सही तयार केले आहेत. तेही स्थानिकच आहेत. रोप-वे पर्यंत येणाऱ्या वाहनांची संख्या एवढी मोठी आहे की त्यांच्या पार्किंगसाठी स्थानिक शेतकऱ्यांनी व्यवस्था उभ्या केल्या आहेत. जोगांचे उपहारगृह आणि निवारव्यवस्था वाढत्या संख्येला अपुरे पडत असल्यामुळे स्थानिकांनी ही व्यवस्थाही केली आहे.

रायगडला जाण्यासाठी आणि राहण्यासाठी तिकिट आणि निवास याचे बुकिंग पुण्यातल्या त्यांच्या कार्यालयात करता येते. पण त्याबरोबर पुणे, ठाणे, डोंबिवली येथील अनेक ट्रॅव्हल एजन्सींकडेही बुकिंगची सोय उपलब्ध आहे.

महाराष्ट्रात जागोजाग अशी पर्यटनस्थळे विकसित होऊ शकतात. एखाद्या व्यक्तीने जिद्दीने तसे ठरवले तर काय घडू शकते याचे रायगड रोप-वे उत्तम उदाहरण आहे. रोप-वे सारख्या गोष्टी फायदेशीर ठरणार नाहीत, असे सांगणाऱ्यांनाही जोग यांनी तो उत्तम रितीने चालवून आदर्श उदाहरण घालून दिले आहे.

मिलेनियम प्रॉपर्टीज प्रा.लि.
प्रेस्टीज कॉर्नर, १ ला मजला, ३९/२, शैलेश सोसायटी,
अलंकार पोलीस चौकीजवळ, कर्वेनगर, पुणे ४११०५२
फोन - ०२०-२५४५९७३०/३५

